नियमीत दिवाणी दावा क्र. ८५/२०१८ मधील

नि.४९ वरील आदेश

सीएनआर–एमएचएसएन–१२–०००६६५–२०१८

(जालिंदर सुर्यवंशी वि. राजू सुर्यवंशी वगैरे)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी नं.१ व १४ विरुद्ध तुर्तातुर्त ताकीद देणेत यावा याकरिता केलेला आहे.

२. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुद्ध दावा मिळकतीचा तो मालक आहे असे जाहीर होवून मिळण्याकरिता व बीएनडी केस क्र. ३/२०१६ व ४/२०१६ कामी झालेले आदेश रद्द होवून मिळण्याकरिता केलेला आहे.

३. वादीने प्रस्तुतच्या दाव्यामध्ये असे कथन केले आहे की, मौजे–सावंतपूर, ता. पलूस, जि. सांगली येथील जुना गट नं.४१६३ चा नवीन गट नं. १०४८ क्षेत्र १हे ४७ आर पोट खराब ०हे ०६ आर दाव्यात परिच्छेद–१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणारी मिळकत ही दावा मिळकत आहे. दावा मिळकत ही वादीचे पूर्वहक्कदार केरु नाना सुर्यवंशी यांना गट एकत्रीकरण योजनेनुसार २१/०३/१९७६ रोजी मिळाली असून, तिथपासून वादीची पूर्वहक्कदारांपासून कब्जेवहिवाट दावा मिळकतीमध्ये होती व आहे. गट एकत्रीकरण योजनेत दावा मिळकतीचे क्षेत्र जुन्या गटाच्या नकाशाप्रमाणे (गट नं.४१६३ प्रमाणे) तयार झाले. प्रतिवादी नं. १ ते २५ यांनी मोजणीदारास सामील करुन घेवून मूळ गट योजनेतील नकाशाशी विसंगत नकाशा तयार केला व बेकायदेशीररित्या बीएनडी कायद्याचे कामकाज उपविभागीय अधिकारी, कडेगाव यांच्यापुढे चालवले व

उपविभागीय अधिकारी यांना मालकी ठरवण्याचा अधिकार नाही. वादीची दावा मिळकतीमध्ये पहिलेपासून वहिवाट होती व आहे. तसेच, दावा मिळकतीच्या क्षेत्रामध्ये बीएनडीच्या अर्जामध्ये रंगवून दाखवलेल्या क्षेत्रामध्ये वादीचे पक्के बांधकाम असलेले शेड आहे. वास्तविक उपविभागीय, अधिकारी यांना कायद्याने अतिक्रमण काढून देण्याचे अधिकार प्राप्त नाहीत. तसेच, बीएनडी अर्जामध्ये दाखल केलेले नकाशे हे चुकीचे आहेत व त्या नकाशाच्या आधारे वादीविरुद्ध प्रतिवादी विविध महसूल खात्याचे आदेश घेवून वादीचा कब्जा हिरावून घेवून वादीचे नुकसान करत आहेत. त्यामुळे, वादीने निरंतर ताकीदीचा व जाहीर स्वरुपाची दाद मिळणेकामी दावा दाखल केला आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जात वादीने असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा वादी व त्यांचे इतर सहहिस्सेदार हे दावा मिळकतीचे मालक आहे असे जाहीर होवून मिळणेकरिता केलेला आहे व त्याकामी बीएनडी केस क्र. ३/२०१६ व ४/२०१६ च्या निकालाविरुद्ध दाद मागून त्याकामी दाखल केलेले मोजणी नकाशे व मोजणीदार यांनी केलेली मोजणी याबाबत वादी यांनी दाव्यामध्ये आक्षेप नोंदवला आहे व वादी यांनी असे कथन केले आहे की महसूल खात्याला मालकी हक्क ठरवण्याचे अधिकार नाहीत. तसेच, महसूल अधिका–यांनी पुराव्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार मोजणीदाराचा जबाब घेतलेला नाही व त्यामुळे वादातील मोजणी नकाशामध्ये मोजणीदार यांनी दावा मिळकतीमध्ये केलेले बांधकाम देखील दाखवलेले नाही. मोजणी ही जुन्या रेकॉर्डप्रमाणे

व्यवस्थितरित्या झालेली नाही. तसेच, बीएनडी केस कामी महसूल कोर्टापुढे चालवलेले कामकाज वादातील मोजणी व नकाशा याकामी दाव्यामध्ये योग्य त्या हरकती घेतलेल्या आहेत अशी परिस्थती असताना प्रतिवादी नं. १ व १४ दावा प्रलंबित आहे ही गोष्ट लपवून तहसिलदार, पलूस यांच्याकडे अर्ज करुन मंडल अधिकारी यांचेमार्फत त्या निकालाच्या आदेशची अंमलबजावणी प्रतिवादी नं .१ व १४ करु पाहात आहेत. त्यानंतर दि. ०२/०२/२०२२ रोजी वादीला तशी नोटीस मिळाली असे दि. ०३/०३/२०२२ रोजी मंडल अधिकारी यांनी कब्जा देण्याचे कळवले आहे. सदरील दावा हा प्रलंबित असून देखील अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा हा महसूल अधिकारी यांना कोणताही हक्क अधिकार नसताना बेकायदेशीरपणे काढून घेवून पाहत आहेत. वादीला दाव्यामध्ये यश येण्याची शक्यता वाटत आहे. परंतु, मंडल अधिकारी यांनी पाठवलेल्या नोटीसीमुळे दाव्याचे कामकाज पुढे चालवणे अवघड होत आहे व मंडल अधिकारी यांनी अंमलबजावणी केल्यास प्रस्तुतचा दावा निष्फळ होईल व वादीचा कब्जा गेल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल व दाव्यामध्ये अनेकीकरण होईल. त्यामुळे, वादी यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडील बीएनडी अर्ज क्र. ३/२०१६ व ४/२०१६ च्या आदेशाच्या आधारे अंमलबजावणी करु नये म्हणून तुर्तातुर्त ताकीद मिळावी याकरिता केला आहे व नि.४९ चा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १,२ प्रमाणे दिला आहे असे समजण्यात यावे अशी पुरसीस देखील वादीने दिली आहे.

५. प्रस्तुतच्या अर्जास प्रतिवादी नं.१ व १४ यांनी त्यांचे म्हणणे नि.५२ द्वारे सादर केले. संबंधित प्रतिवादींनी अर्जातील कथने स्पष्टपणे नाकारली. संबंधित प्रतिवादी यांनी असे कथन केले की, याकामी प्रतिवादी नं.१ व १४ यांनी नि.२६ ला जी कैफियत दिली आहे तो या अर्जास दिलेल्या म्हणण्याचा भाग समजण्यात यावा. तसेच, पुढे संबंधित प्रतिवादी यांनी असे म्हणणे दिले आहे की,प्रस्तुतकामी बीएनडी अर्ज क्र.३/२०१६ व ४/२०१६ विरुद्ध जाहीर स्वरुपाची दाद मागितली असली तरी उपविभागीय अधिकारी, कडेगाव यांनी तो आदेश पारित केला होता व त्यांना याकामी महत्वाचे पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. त्यामुळे या कारणास्तव देखील वादीचा अर्ज फेटाळण्यास पात्र ठरत आहे.

६. प्रतिवादी नं.१ व १४ यांनी पुढे असे म्हणणे दिले की, प्रतिवादी नं.१ यांनी बीएनडी अर्ज क्र. ४/२०१६ चे कामी उपविभागीय अधिकारी, कडेगाव यांच्याकडे वादी यांनी प्रतिवादी नं.१ यांचे गटामध्ये म्हणजेच गट नं.९८८ मध्ये केलेले ०हे ०.३.५० आर अतिक्रमण काढून मिळणेकरिता केले होते. तसेच, प्रतिवादी नं.१४ यांचे गट नं. ९८७ मधील केलेले ०हे०.३.७५ आर चे अतिक्रमण काढून मिळणेकरिता दाखल केले होते. सदर प्रतिवादी नं .१ व १४ यांनी उपअधीक्षक भूमीअभिलेख, पलूस यांचेकडून मोजणी करुन हद्दी कायम करुन घेतल्या आहेत. तसेच, त्याकामी वादीने केलेल्या अतिक्रमणाकामी संबंधित बीएनडी अर्ज दाखल केल्याची कल्पना वादीला होती व आहे. कारण, सदर दोन्ही

बीएनडी अर्जामध्ये प्रस्तुतचे वादी हजर होवून त्यांनी त्याचे म्हणणे दिलेले होते. मोजणी चुकीची अथवा बेकायदेशीर असल्याबाबतची कोणताही पुरावा वादीने सामील केलेला नाही. त्यामुळे, उपविभागीय अधिकारी यांनी प्रतिवादी नं.१ व १४ चा अर्ज मंजुर केला. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत.

७. प्रतिवादी नं.१ व १४ यांनी पुढे असे म्हणणे दिले की, वादी यांनी दावा मिळकतीची उपअधीक्षक भूमीअभिलेख यांचेमार्फत मो.र.नं. १५२९/२०१४ द्वारे दि.१३/४/२०१५ रोजी ते २१/०४/२०१५ रोजी हद्द कायम मोजणी केलेली आहे. सदर मोजणी मध्ये देखील प्रस्तुत वादी यांनी प्रतिवादी नं.१ यांचे गट नं.९८८ मध्ये व प्रतिवादी नं.१४ चे ९८७ मध्ये अतिक्रमण केल्याचे दिसून आले. त्यानंतर देखील वादी यांनी पुन्हा दावा मिळकतीची मोजणी मो.र.नं. १७२९/२०१६ अन्वये दि. १९/०१/२०१६ रोजी केली व सदर मोजणी मध्ये देखील वर नमूद केल्याप्रमाणे वादीने प्रतिवादी नं.१ व १४ यांच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण केल्याचे दिसून आले. एकंदरित दोन्हीही मोजणीमध्ये वादीने अतिक्रमण केल्याचे दिसून आले. वास्तविक अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा वादीला सोडण्याचा नाही, त्यामुळे अडथळा निर्माण करण्यासाठी प्रस्तुतचा दावा व अर्ज वादीने केला आहे.

८. प्रतिवादी नं.१ व १४ यांनी पुढे असे म्हणणे दिले की, प्रस्तुत वादी यांनी दि. २३/१०/२०१८ रोजी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे व दावा प्रलंबित असताना देखील वादीने दावा मिळकतीमधील काही क्षेत्र ति–हाईत

इसमांना खरेदी देण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार वादी यांनी दावा मिळकतीमधील ०हे ०१.५० आर एवढे क्षेत्र मिनाक्षी कुबेर सावंत यांना रक्कम रुपये २,२०,०००/– च्या मोबदल्यात दस्त क्र. ५४२/२०२१ ने विकले आहे व सदर खरेदी दस्ताची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ ला फेरफार नं. ५४९० ने झाली आहे. तसेच दि.०६/०४/२०१८ रोजी देखील वादीने दावा मिळकतीमधील ०हे ०६ आर एवढे क्षेत्र रेश्मा राहूल जाधव यांना रक्कम रुपये ३,५०,०००/– च्या मोबदल्यात दस्त क्र.८६१/२०१८ ने विकले आहे व सदरील दस्ताची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ ला फेरफार नं. ५२३९ ने झाली आहे.

९.		प्रतिवादी नं.१ व १४ यांनी पुढे असे म्हणणे दिले की, वादी यांनी दि. ०३/०३/२०२१ रोजी दावा मिळकतीमधील ०हे ०५ आर एवढे क्षेत्र कैलास लक्ष्मण जाधव यांना रक्कम रुपये २,५०,०००/– दस्त क्र. १०१५/२०२१ ने विकले आहे व तशी नोंद दावा मिळकतीचे ७/१२ ला फेरफार नं. ५६३१ ने झाली आहे. सदरील वस्तुस्थिती वादीने न्यायालयापासून लपवली आहे व दावा प्रलंबित असताना देखील दावा मिळकतीमधील क्षेत्र वादी विकले आहेत. वास्तविक प्रतिवादी यांच्या मिळकती म्हणजे अतिक्रमित केलेले क्षेत्र हे वादी परस्पर ति–हाईत इसमाला विकू पाहात आहेत. त्यामुळे प्रवितादी नं. १ व १४ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच, कायदेशीर पद्धतीचा अवलंब करुन प्रतिवादी नं. १ ते १४ हे अतिक्रमित क्षेत्राचा कब्जा वादीकडून काढून घेत

आहेत, त्यामुळे वादीचे नुकसान होणार नाही. या सर्व कारणास्तव वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

१०. अर्जातील कथन व म्हणणे व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यावर खालील मुद्दे विचारार्थ येत आहेत व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह नोंदवत आहे.

अ.क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	वादीला सकृतदर्शनी केस असल्याचे वादी शाबीत करतात काय ?	**नकारार्थी**
२.	न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ?	**नकारार्थी**
३.	वादीचा अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वादीने शाबीत केले आहे काय ?	**नकारार्थी**
४.	काय आदेश ?	***अर्ज नामंजूर करण्यात येतो***

कारणमिमांसा

११. वादीतर्फे विद्वान विधीज्ञा श्री. व्ही. जी. जाधव यांनी असा युक्तीवाद केला की भारतीय पुरावा कयदा कलम ८३ अन्वये देखील एखादा नकाशा शासकीय अधिका–याने जरी बनवला असला तरी तो बरोबरच बनवला आहे हे ग्राह्य धरता येणार नाही व त्यामुळे बीएनडी अर्जामध्ये दाखल केलेल्या नकाशावरुन प्रथमदर्शनी हा तर्क लावून चालणर नाही की ते नकाशे बरोबरच आहेत. सदरकामी त्यांनी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

1) Ushabai W/o Sharadchandra Vs. Wasudeo S/o Baliramji Mehre, 2004 (2) Mh.L.J. 594, wherein Hon'ble Bombay High court has taken into consideration the provisions of Section 83 of Indian Evidence Act and held that onus of proving the map is accurate lies on the party who produces it. The maps must be proved by the person who has prepared them. Where the maps are made for the purpose of Suit there is, even apart from fraud which may exist, a tendency to colour, exaggerate and favour which can only be countenanced by swearing the maker to trust of his plan. Therefore, there is no presumption of accuracy.

१२. सदरकामी, वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा देखील युक्तीवाद केला की, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम १३८ अन्वये केवळ जास्तीत जास्त हद्दी खुणा निश्चित केल्या जावू शकतात व त्यानुसार एखाद्या व्यक्ती चुकीच्या कब्जामध्ये असल्यास ते काढून देण्याचे अधिकार महसूल खात्याला नाहीत व विशेषतः जेव्हा मोजणीदार हा प्रतिवादी नं. १ व १४ यांनी संबंधित बीएनडी अर्जामध्ये साक्षीदार म्हणून तपासला नाही, त्यामुळे संबंधित मोजणी नकाशे हे भारतीय पुराव्याच्या कायद्याच्या तत्वाला अनुसरुन शाबित केलेले नाहीत. त्यामुळे, प्रथमदर्शनी बीएनडी अर्जामधील निकालाच्या आधारे प्रतिवादी नं.१ व १४ हे अंमलबजावणी करु शकत नाहीत. सदरकामी त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

1) Gajanan S/o Nagrao Devtale Vs. Madhukar s/o Motiram Umarkar, writ petition 1368/2017, decided on 22/03/2018, wherein Hon'ble Bombay High Court has held that if the land in question is private property, then, revenue

authorities had no jurisdiction to direct possession of the portion to be delivered to other party. The provision of Section 138 of Maharashtra Land Revenue Code are with regard to settlement of boundary disputes. Merely, because the words, "wrongly in possession" have been mentioned therein, it does no give the jurisdiction to revenue authority to direct delivery of land that is alleged to have been encroached and jurisdiction in that regard is with civil Court.

१३. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की दावा मिळकतीचे क्षेत्र जे गट एकत्रीकरण नकाशा (नि.५६/१) मध्ये दाखवले आहे त्याचप्रमाणे प्रतिवादीने दाखल केलेल्या मोजणी नकाशामध्ये दावा मिळकतीचे क्षेत्र तसे दर्शविलेले नाही. या ही वरुन प्रथमदर्शनी मोजणी सदोष आहे हे दिसून येत आहे. त्यामुळे वादीच्या बाजूने प्रथमदर्शनी केस आहे व मोजणीच्या चुकीच्या नकाशाच्या आधारे मंडल अधिकारी यांनी अंमलबजावणी केली तर वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल व वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल देखील आहे. या सर्व कारणास्तव वादीचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

१४. प्रतिवादी नं.१ व १४ चे विद्वान वकील श्री. हडदरे यांनी असा युक्तिवाद केला की, वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत. यापूर्वी वादी यांनी मो.र .नं. १५२९ /२०१४ रोजी मोजणी मागवलेली होती, तसेच, मो. र. नं. १७२९/२०१६ अन्वये देखील वादीने मोजणी मागवलेली होती, हे (नि.५८/८ व ५८/९ च्या) नकाशावरुन दिसून येते. सदर दोन्ही मोजणीमध्ये

प्रतिवादीनी त्यांच्या म्हणण्यात कथन केल्याप्रमाणे वादी हा अतिक्रमित क्षेत्र उपभोगत आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर दोन्हीही मोजणीपैकी विशेषतः मो. र.नं.१७२९/२०१६ प्रमाणे दि. १९/०९/२०१६ रोजी झालेल्या मोजणीबाबत वादीने दाव्यामध्ये कोणत्याही प्रकारचे कथन (pleading) केलेले नाही.

१५. प्रतिवादी नं. १ व १४ चे विद्वान विधीज्ञ यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, दावा मिळकतीमधील क्षेत्र दावा प्रलंबित असताना देखील ति–हाईत इसमांना वेळोवेळी विकेलेले आहे व त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून दाव्यात सामील केलले नाही व विशेषतः संपूर्ण दावा मिळकतीचे वादी हे मालक आहे अशी मुख्य मागणी वादी करतात व ज्यांना क्षेत्र विकलेले आहे त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार सामील न केल्याने वादी हे दावा मिळकतीचे संपूर्ण क्षेत्राची जाहीर स्वरुपाची दाद मिळणेस पात्र नाहीत. तसेच, वेगवेगळया वेळी झालेली दावा मिळकतीची मोजणी ही बरोबर असून केवळ मोजणीदार तपासला नाही या वादीच्या युक्तीवादामध्ये तथ्य नाही. बीएनडी अर्जामध्ये दिलेले आदेश योग्य व बरोबर आहेत. या सर्व कारणास्तव वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही व अर्ज मंजुर झाल्यास वादीपेक्षा प्रतिवादी नं. १ व १४ चे नुकसान जास्त होईल. या सर्व कारणास्तव वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

१६. सदरकामी, ***उषाबाई शरदचंद्र*** या न्यायनिर्णयाचा आदर राखून असे म्हणता येईल की भारतीय पुरावा कायदा कलम ८३ नुसार शासकीय कर्मचा–याने

बनवलेले नकाशा हा अचूक आहे हा निष्कर्ष मोजणीदार तपासल्या शिवाय काढत येणार नाही ही बाब बरोबर आहे व ***गजानन देवताळे*** या न्यायनिर्णयाचा आदर राखून महसूल अधिका–यांना महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम १३८ नुसार हद्दी खुणा निश्चित करुन देण्याचा अधिकार आहे व अतिक्रमण काढून देण्याचा अधिकार नाही. असे जरी असले तरी कायद्यातील एक अत्यंत महत्वाचा सिद्धांत आहे की वादीला त्याची केस त्याच्या पायावर सिद्ध करावी लागते व प्रतिवादीचा कमकुवतपणा दाखवून वादी दाव्यात यशस्वी होवू शकत नाही.

१७. तसेच, विशेषतः दाव्यामध्ये निरंतर ताकीद मागितली असून प्रस्तुतच्या अर्जामध्ये तुर्तातुर्त ताकीद मागितली आहे व मनाई अर्ज पाहताना कायद्यातील एक महत्वाचा सिद्धांत म्हणजे one who seeks equity has to do equity and have to come with clean hands या तत्वाचा अवलंब वादीने केला आहे की नाही ही बाब याकामी विचारात घेणे अत्यंत आवश्यक वाटत आहे. सदरकामी, वादी दावा मिळकतीची मालकी जाहीर होवून मागत आहेत, परंतु, प्रतिवादीने दाखल केलेले फेरफार नं. ५२३९, ५४९०, ५६३१, (नि.५८/५ ते ५८/७) वरुन प्रथमदर्शनी वादीने संबंधित गटामधील काही क्षेत्र विविध इसमांना विकल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे व संबंधित इसमांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील केलेले नाही. तसेच, वादी दावा मिळकतीत नमूद केलेल्या क्षेत्राचे मालक आहेत असा जाहीर ठराव होवून मिळावा ही मागणी मागत आहेत. परंतु, संबंधित पक्षकारांना सामील न केल्याने वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे

आलेले नाहीत असे प्रथमदर्शनी वाटत आहे. तसेच, (नि.५८/८) मो.र.नं. १७२९/२०१६ च्या दि. १९/०१/२०१६ च्या मोजणीबद्दल दाव्यामध्ये पुरेशी सखोल अशी कथने केलेली नाहीत व त्याबाबत स्पष्टपणे उल्लेख नसल्याने वादीने न्यायालयापासून महत्वाची बाब लपवली आहे असे देखील प्रथमदर्शनी वाटत आहे व त्यामुळे ते स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत व सदर मोजणीनुसार वादीने अतिक्रमण केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. परंतु, वादी त्याबद्दल दाव्यात काहीही बोलत नाही. वादीने सदर मागितलेली मोजणी का चुकीची आहे त्याबद्दल दाव्यात वादी कथन करत नाही. ही पण गंभीर बाब आहे व त्यामुळे त्यांनी महत्वाच्या बाबी लपवल्या या तत्वाची बाधा प्रथमदर्शनी त्यांना येत आहे.

१८. सदरकामी, मी खालील न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे.

1) Amarsingh Vs Union of India Writ petition no. 39/2006, decided on 11/05/2011, wherein the Hon'ble Apex Court has held that it is the duty of the party asking for injunction to bring the notice of all the facts material to determination of his right to that of injunction and it is not excuse for him to say that he was not aware of importance of any fact which he was omitted to bring forward. Courts have over the centuries frowned upon litigants who, with intent deceive and mislead the Courts, initiated proceeding without full disclosure of facts. Court held that such litigants have come with unclean hands and are not entitled to be heard on the merits of their case. It is fundamental principle of jurisprudence that litigants must observe total clarity and candour in their pleadings, especially, when it contains prayer of injunction.

१९. एकंदरित वादी न्यायालयाच्या पुढे स्वच्छ हाताने न आल्याने व महत्वाच्या बाबी लपवल्याने वादी तुर्तातुर्त अर्जामध्ये मागितलेल्या मागणीस पात्र ठरत नाहीत. त्यामुळे वादीच्या बाजुने ख–या अर्थाने प्रथमदर्शनी केस असल्याचे वाटत नाही. तसेच वादीच्या बाजुने न्यायाचा समतोल नाही व वादीचा अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वाटत नाही. या सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर 'नकारार्थी' देतो व मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारित करतो.

आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2022.04.06 13:56:43 +05'30'

पलुस. **(नि.दि. रुद्रभटे)**

दिनांक– ०५/०४/२०२२ **सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर पलूस**

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

Name of Stenographer	:	Pravin G. Sabale
Court	:	Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus
Date	:	05/04/2022
Signed by the Presiding Officer on	:	05/04/2022
Uploaded on	:	06/04/2022